## प्रकरण दुसरे

# स्त्री पुरूष तुलना या निबंधातून आलेले स्त्री विषयक विस्तार

# प्रकरण दुसरे

## स्त्री पुरूष तुलना या निबंधातून आलेले स्त्री विषयक विचार

१९वे शतक हे मराठी साहित्याच्या दृष्टीने मोलाचे शतक ठरते. इतर वाङ्.मयप्रकाराबरोबर निबंध या वाङ्.मयप्रकाराची सुरूवात व भरभराट याच शतकात झाली. इंग्रजी वाङ्.मयाच्या अनुषंगाने व वृत्तपत्राच्या सहाय्याने निबंधलेखनातून वैचारिक व मोलाचे विचार लोकापर्यंत पोहोचविण्याचे श्रेय चिपळूणकर, आगरकर, टिळक, फुले या सारख्या लेखकाना जाते. तसेच या वैचारिक लेखनाचा परिणाम काही स्त्रियावर होवून अनेक स्त्रियानी स्त्री समस्येवर उदा. विधवा स्त्रियांवर तसेच विवाहीत स्त्रियांवर होणारे अत्याचार त्यांची होणारी कुचंबणा यावर प्रकाश टाकून या अत्याचाराविरूध्द आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी पंडिता रमाबाई मिसेस फरार, मांग जातीतील फुलेंची विद्यार्थिनी मुक्ताबाई, सावित्रीबाई फुले यांच्या पंक्तीत बसणाऱ्या ताराबाईनी देखील स्त्रियांच्या समस्येवर प्रकाश टाकून स्त्री पुरूष यांच्या स्वभावाबद्दल, वागणुकीबद्दल तुलना करून स्त्रिया व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्यासाठी स्त्रीपुरूषतुलना नावाचा एक छोटासा पण अतिशय प्रभावी निबंध लिहिलेला आहे.

प्रत्येक स्त्रिच्या जीवनाच्या दोन महत्त्वाच्या अवस्था असतात – १) विवाहपूर्व अवस्था, २) विवाहोत्तर या दोन्ही जीवनाचे चित्रण करणारा असा एक महत्वपूर्ण असा हा निबंध आहे. हा निबंध देशभगिनींचा अभिमान जागृत करणारा आहे. या निबंधातील विचार पुढील काळातही मार्गदर्शक ठरणारे आहेत. संपूर्ण पुस्तकात सामाजिक विचार धार्मिक विचार, शैक्षणिक विचार साहित्यिक विचार, भारतीय शास्त्रधर्म यांचे दाखले देता देता स्त्री व पुरूषांच्याबद्दल विचार व्यक्त केलेले आहेत. पण आपल्याला या प्रकरणात स्त्रीपुरूष तुलना

या निबंधातून ताराबाईनी स्त्री विषयक विचार कसे व्यक्त केलेले आहेत याचा विचार करावयाचा आहे.

ताराबाई एक स्त्री म्हणून जगत असताना आणि आपल्यासारख्या अनेक स्त्रियांचे जगणे पहात असताना त्याना जे जे जाणवले जे जे प्रत्यक्ष अनुभवाला आले त्या सर्वांची गोळा बेरीज त्यानी येथे मांडलेली आहे.

## २.१ ताराबाईंच्या काळातील कुटुंबव्यवस्था :

पुरूष वर्चस्व स्वीकारणारी कुटुंबव्यवस्था पुरूषप्रधान सामाजिक आचार विचारांचे नियमन करणारी शास्त्रे व धर्म पुरूषरचित सारा अर्थव्यवहार पुरूषांच्या हातात न्यायसंस्था पुरूषप्रधान आणि राजसंस्था स्त्रीप्रश्नाबाबत उदासिन तत्कालीन संपर्कमाध्यमे व शिक्षण व्यवस्था पुरूषांच्या स्वाधीन अशा परिस्थितीत एका खानदानी मराठा घराण्यातील विलक्षण संवेदनशील स्वभावाची तीक्ष्ण बुध्दीची "बंदिवानाचे" जीवन जगणारी स्त्री जेंव्हा स्त्रीपुरूषसंबंधाचा विचार करू लागते तेव्हा तिच्या अंत:करणात माजलेली खळबळ परखड शब्दात बाहेर पडू लागते. " विजयालक्ष्मी" या विधवेवर ओढवलेल्या दारूण प्रसंगातून जे काहूर माजले त्यामुळे ताराबाईना सात्विक संताप आला व तो भावोद्रेक प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने अभिव्यक्त झाला. आणि त्यातून त्यानी आपले स्त्रीविषयक विचार व्यक्त केले.

पुस्तकाची सुरवात मुळी " गरीब व अबला यांच्या दृष्कृत्याविषयी अलीकडे सर्व वर्तमानपत्रात बरेच छापून नयेते, तरी हा महान अनर्थ मिटवून टाकण्यास तुम्ही कोणीच पुढे होत नाही याचे कारण काय बरे." ? [१] असा प्रश्न ताराबाईने केवळ पुरूषालाच नव्हे तर

स्त्रीयांना ही विचारलेला आहे. कारण ताराबाईंच्या काळात पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीयांच्या आचारविचाराना अजिबात किंमत नव्हती. बालविवाह पुनर्विवाहास विरोध केशवपन यासारख्या रूढीना ऊत आला होता. अशा परिस्थितीत जर का स्त्रियांच्या हातून एखादा अनर्थ घडला तर त्या अनर्थाला अनुसरून त्या स्त्रीचे धिंडवडे काढले जात असत आणि वर्तमानपत्राना तर स्त्रीला बदनाम करण्यासाठी स्त्रीयांबद्दल निंदा करण्यासाठी वर्तमानपत्र खपण्यासाठी स्वादिष्ट खाद्यच मिळत असे. अशावेळेस या स्त्रियांच्या हातून जे दृष्कृत्य घडते त्याचे कारण काय असेल ? हे शोधून काढून हा महाअनर्थ मिटवून टाकण्यचा कुणीच प्रयत्न करीत नाहीत. म्हणून ताराबाईना ह्याची अत्यंत चीड येते.

संपूर्ण निबंधात दोन प्रकारच्या स्त्रिया दाखविल्या आहेत – १) विवाहित आणि २) विधवा. स्त्रिच्या बाल्यावस्थेचा व कौमार्यावस्थेचा वेगळा विचार त्यांनी व्यक्त केलेलाच नाही. कारण एकोणिसाव्या शतकात बालविवाहाच्या प्रथेमुळे तिचे बाल्यच संपुष्टात येत असे. मुलगी पाळण्यात असल्यापासून तिच्या विवाहाचा विचार चालू होई. या संदर्भात लोकहितवादीनी सांगितलेली वस्तुस्थिती लक्षात घ्यावी अशी आहे.

"आठ-नऊ वर्षे मुलीस झाली म्हणजे आईबापास काळजी पडते की पोरीचे लवकर लग्न कले पाहिजे. नाहीतर आम्हास लोक हसतील की पहा यानी आपली मुलगी केवढी वाढविली. अजून लग्न केले नाही ! " [२]

अशाप्रकारच्या बालविवाहाच्या पध्दतीमुळे खरे तर मुलीना त्यांच्या बाल्यावस्थेची जाणच रहात नसे. बालपणातच प्रौढत्व प्राप्त होत असे. त्यांच्या मनातील बालभावनांचा चुराडा होत असे. हसायचे खेळायच्या दिवसात त्याना संसाराचा गाडा ओढावा लागत असे. त्या शिक्षणास पारख्या होत असत. नवरा, सासू, सासरे, मुले-बाळे आणि कौटुंबिक व

सामाजिक बंधन थोडक्यात चूल आणि मूल एवढेच तिचे क्षेत्र मर्यादित झालेले होते. ताराबाईनी एकोणिसाव्या शतकातील जीवन फार जवळून न्याहाळलेले होते. म्हणूनच त्यानी विवाहाच्या तऱ्हा अतिशय मार्मिकपणे न्याहाळलेल्या दिसतात. त्यानी त्याबद्दल आपल्या निबंधात त्या काळातील विवाहाच्या तऱ्हा सांगितल्या आहेत. विवाह ही स्त्रीच्या जीवनातील सर्वात महत्वाचे स्थित्यंतर घडविणारी घटना असते हे बहुतेक ताराबाईंनीही अनुभवलेले दिसते.

## २.२ ताराबाईनी अनुभवलेले विवाह सोहळे :

१) मुली ऐंशी नव्वद वर्षाचे श्रीमंत म्हाताऱ्यास रूपयांची थैली घेवून व त्याचे श्रीमंतीवर नजर ठेवून "नवरा मेला तरी चिंता नाही, इला पैशाला तर कांही कमी नाही नां ? दोन दिवस खाईल पिईल, लेईल, नेसेल, एक नवरा नसला तर काय चिंता आहे ? असे म्हणून वाघाला जशी बकरी द्यावी त्याप्रमाणे बेधडक देतात." [३]

२) लग्नाची दुसरी तऱ्हा – "कोणी सवतीवर मुली देतात." [४]

३) लग्नाची तिसरी तऱ्हा – कोणाला लेकी फार म्हणून आल्या वरांस देतो कसा का असेना ? कोणी धादांत कुलागारास दृष्टीने पहात असताही तेथेच मुलीला लोटितो. कोठे नवरा कुरूप, दुर्गुणी हीनवर अतिशय जाच, हाणमार, खाण्यापिण्याचेही हाल अशा अनेक आपेष्टा करणारा असला तरी त्याच्या स्वाधीन कसाबाच्या हाती गायीप्रमाणे कोणी आपल्या मुली करितात. [५]

४) लग्नाची चौथी तऱ्हा – " कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकिचे फक्त लाडाकरिता व आवडीकरिता एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे जवळच बाळगतात. " [६]

अशा या चार विवाहाच्या पध्दती ताराबाईंनी १८८२ मध्ये न्याहाळलेल्या आहेत. त्या अजूनही आम्ही भारतीय इतर देशाबरोबर २१व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना देखील अवलंबित आहोत. पहिली विवाहाची पध्दत शहरात व सुशिक्षित कुटुंबात आपल्याला विशेष आढळून येत नाही. पण खेड्यात व अशिक्षित कुटुंबात अजूनही या पध्दतीचा अवलंब होत असतो. असे प्रकार अनेकवेळा वृत्तपत्रातून वाचावयास मिळत असतात. आणि इतर तीन विवाहसोहळ्याच्या ज्या प्रथा आहेत त्या मात्र अजूनही आपल्या भारतीय सामाजिक जीवनात कित्येकवेळा दिसून येतात. जे विचार ताराबाईंनी १०० वर्षापूर्वी व्यक्त केले आहेत, जी चीड त्यांच्या अंत:करणात निर्माण झालेली आहे तशीच चीड वास्तविक पाहता आजच्या समाजसुधारक म्हणवून घेणाऱ्या स्त्रीमुक्ती करून देण्यासाठी धडपडणाऱ्या तसेच स्त्री समस्येवर कार्य करणाऱ्या संघटनाना येणे गरजेचे आहे. पण अजूनही शंभरवर्षाच्या अंतराच्या मानाने लग्नसोहळ्याच्या पध्दतीमध्ये जेवढी सुधारणा होणे अपेक्षित आहे तेवढी झालेली नाही असे वाटते.

## २.३ ताराबाईंनी न्याहाळलेले विवाहपध्दतीतील दोष व त्यामुळे होणारे अनर्थ :

बालविवाहाच्या पध्दतीमुळे नवऱ्याच्या वयाला कोणतीही मर्यादा नव्हती त्यामुळे श्रीमंत नव्वद वर्षाचा म्हातारादेखील आपल्या नातीच्या वयाची मुलगी केवळ हौसेखातर बायको म्हणून स्वीकारीत असे व ती मुलगी वयात यायच्या आतच मरत असे असा हा म्हातारा नवरा मेला की त्या बालविधवेचे हाल कुत्राही खात नसे हे ताराबाईंनी पाहिलेले होते.

म्हणून त्या म्हणतात, "ज्या लेण्यानेसण्याने ज्याला आनंद जो तिचे कौतुक करणार तिला प्राणापेक्षाही पाहाणार. तो तर गेला मग तिला हे जग अरण्यासारखेच. तिला ते कोरडे सोहाळे कशाला रे ? त्यापेक्षा पूर्वी सती जात ते बरे एकदाचे आपलीही राख केली म्हणजे सरली. " [७]

मुलीचे एकदा लग्न झाले की तिला आईवडिल यांचेपासून दूर जावे लागते आणि त्यात ' नवरा ' मेला की त्याच्याही प्रेमाला मुकावे लागते. त्यामुळे तिने मग "कोणाचे बळावर हे तरूणपणाचे प्रज्वलित इंगळ पदरात वागवून दिवस काढावे बरे "[८] ? असा प्रश्न ताराबाई करतात. खरोखरच या प्रश्नाचे २१व्या शतकात स्त्रीचे अंत:करण भरून आल्याशिवाय राहत नाही.

सवतीवर मुली देण्याच्या संदर्भात त्यानी नोंदविलेले निरीक्षण केवळ वास्तवदर्शीच नाही तर प्रीतीभावनेने अंत:करण उकलून दाखविणारे आहे. दोघी बायकाना समसमान प्रेम देवून समान वागणूक देणारे पुरूष विशेषकरून कमीच असतात. त्याबाबतीत ताराबाई म्हणतात,

" प्रिती म्हणजे आंबा किंवा जांब नाही म्हणून वाटून घेता येईल. प्रीती ही केवळ दूधाप्रमाणे आहे. दूध एकदा नासले म्हणजे फिरून त्याचे पुन्हा दूध होत नाही. तशी प्रीती एकदा फाटली म्हणजे ती पुन्हा कधी जुळत नाही. " [९]

कधी कधी तर मुलींच्या भावनेचाविचार न करता त्या फार जणी आहेत म्हणून कोणताही विचार न करता आल्या वरास देवून टाकतात. मग तो कसा का असेना ? त्याचाविचार करीत नाहीत. याचीही चीड ताराबाईना येते.

जे श्रीमंत बाप केवळ लाजकरीता मुलीचे लग्न करून जोडपे आपल्या जवळ बाळगतात त्याबद्दल त्यांना अतिशय राग येतो. बहुतेक येथे ताराबाईचा स्वानुभव अवतरलेला असावा असे वाटते. कारण त्यांच्या वडिलांशी ताराबाई ही लाडकी व एकुलती एक लेक होती. ताराबाईंचे लग्न त्यांच्या इच्छेविरूध्द होवून त्यानी ते जावयाला "घरजावई" केले होते असे सं.ग. मालशे संपादित प्रतिमध्ये नमूद केले आहे. [१०] तेंव्हा ताराबाईंनी बहुतेक स्वतःच्या अनुभवावरून पुढील विचार व्यक्त केले असावेत असे वाटते. त्या म्हणतात, जावई हा आपल्या मुलीबरोबर आपल्या (मुलीच्या माहेरी) रहायला तयार होणार तो गरीबच असणार. तेंव्हा अशा गरीब मुलाना काही " पूर्वपुण्याईने ऐश्वर्य मिळालेले असते. पण त्या ऐश्वर्यासारखी वागणूक त्यांना कोढून येणार ? हे जन्मदरिद्री ताकाबरोबर शेवया खाणारे तेंव्हा तिला तो न आवडून ते केवळ शालजोडीला एकट्याचे ढिगळ याप्रमाणे होवून पुढे जे प्रकार होणे ते होतात. तो बापाचा लाड तिला जन्मभर कामी येतो का नाही बरे ? तेच पहिल्याने योग्य वर योजून जर देते तर त्याना उभयताना आनंदात नांदताना पाहून किती सुख होते बरे." [११]

लग्नसोहळ्याची चौथी तऱ्हा व त्याबद्दलचे ताराबाईनी जे विचार प्रदर्शित केलेले आहेत ते पाहिले तर आजदेखील ते सार्थ वाटतात. फार काय पुढे कित्येक वर्षे देखील या विचारांची गरज वाढेल. कारण केवळ मुलीच्या प्रेमा पेक्षा तिच्या सुखाचा विचार करून आपल्या तोलामोलाचा वर शोधून उभयता आनंदात नांदत असताना पाहून जे सुख मिळते त्या सुखासाठी प्रयत्न करावेत हे विचार मार्मिकपणे ताराबाईनी मांडलेले आहेत. ते अनेक शतकानुशतके काळाच्या मर्यादा ओलांडून जुने होतील असे वाटत नाही.

## २.४ १९व्या शतकातील ताराबाईनी व्यक्त केलेल्या पतिव्रत्य व स्त्री धर्माच्या संकल्पना :

या निबंधाच्या सुरवातीलाच त्यानी स्त्रीधर्माची व्याख्या केलेली आहे. " स्त्रीधर्म म्हणजे काय ? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे त्यानी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेविला, नवरूजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफलक होवून, शंक करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेवून, फितूर, चहाडी, खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले, तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्णमहाराजच गौळ्याचे दही दूध चोरून चंद्रावळीला कलंक लावून आलेत, असे समजून परमात्म्यासारखीच यांची मोठ्या हासतमुखाने देवासारखी पूजा करावी. सेवेत हजर रहावे हा स्त्री धर्म." [११]

संपादक विलास खोले याबाबतीत म्हणतात की, " ऐकोणिसाव्या शतकात या पातिवृत्याच्या कल्पनेचे उदात्तीकरण करण्यात आले. पण त्यामुळे काय साधले ?

१) पातिव्रत्यात पतिनिष्ठा हे केंद्र असल्यामुळे पती हाच गुरू व देव ठरला. परिणामत: पत्नीकडे दास्यत्व व पतीकडे स्वामित्व अशी विभागणी आपोआपच झाली.

२) स्त्रीला लैंगिक स्वातंत्र्य उरले नाही.

३) पती हाच सर्वश्रेष्ठ ठरल्याने तो गौरवाचा धनी ठरला.

४) स्त्रीच्या शीलभ्रष्टतेस वस्तुत: पुरूष जबाबदार असलातरी अपराधी मात्र स्त्री ठरली. कारण पातिव्रत्याचे कठोर पालन तिने केले नाही असे म्हणायला अवसर उरला. "[१२]

13895
A

तत्कालीन समाजात स्त्रीच्या बाबतीत जी पारंपारिक मूल्यकल्पना कार्यरत होती तिचे नांव पातिव्रत्य, स्त्रीवर सत्ता प्रस्तापित करण्यासाठी पातिव्रताकल्पनेची विचारप्रणाली सर्वाधिक उपयोगी ठरली पण अशा परंपरावादी काळातदेखिल ताराबाई पुरूषसत्ताक व्यवस्थेची बारीक चिकित्सा करण्याचे धाडस दाखवतात. त्या म्हणतात, की जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेच पाहिजे. [१३] ही त्यांची प्रमुख अट. पण वास्तव मात्र उलट आहे. बायकाना फसविणे अनेक बायकाशी संबंध ठेवणे, व्यसनाधीन होणे यासारख्या भानगडीत जर पुरूष वर्ग गुंतून पडत असेल तर त्याना देव कसे मानावे ? केवळ पारंपारिक धर्म म्हणतो म्हणून ? याला ताराबाई तयार नाहीत. हा त्यांच्या स्पष्ट व्यक्तिमत्वाचा एक पैलूच म्हणावा लागेल. एकूणच परिस्थितीचा विचार केला असता असे आढळून येते की, संपूर्ण समाजव्यवस्था ही धर्माधिष्ठित होती. जीवनातल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर बहुतेक धर्मातच शोधले जाई असे वाटते अशा काळात जो धर्म विवाहित स्त्रीकडून पातिव्रत्याची अपेक्षा करतो त्या काळात सरळ सरळ टिकेची तोफ डागताना दिसताच आणि ती सार्थही आहे.

## २.५ <u>स्त्री धर्माची पारंपारिक कल्पना आणि आजची स्त्री यांची ताराबाईनी केलेली तुलना</u> :

ताराबाई आपल्या लेखनात तत्कालीन पारंपारिक धर्माबद्दल बोलताना म्हणतात की, " स्त्रीधर्मात नवऱ्याला देव मानले जाते. नवऱ्याच्या सेवेला सतत तत्परतेने हजर राहिले जाते. मग तो नवरा कसा का असेना ? त्याचा विचार केला जात नसे. पण आता तसे नाही. नवऱ्याने पाणी मागितले म्हणजे बाईसाहेब म्हणायच्या आहो मलापण केव्हाची तहान लागली

आहे, त्या तांब्यात पाणी आहे ते तुम्ही प्या आणि मलाही एक प्यालाभर द्या. हा बाळ्या मला उठूच देत नाही काय करू." [१४]

"यजमान जेवायला आल्याबरोबर पाट तांब्या मांडून ताट वाढून पतीचे आवडते पदार्थ वाढीतक गोष्टी सांगत भर्त्याचे मन रंजवीत भोजन होईसतो माशा मारीत बसावे. आता तिकडून आटपले की नाही. वाढा, नऊ वाजले म्हटले की हिकडून जबाब, हो आले आटपत वाढते रोजचे मेले नऊ कपाळी बसलेच. आहो काही डाळ भाजी तर शिजली पाहिजेना ? का तसेच तांदूळ वाढू पानावर ? नित्याचेच आहे. एका दिवसाचे काही नाही. हा आताच पतिव्रतापणा. " [१५]

वरील दोन उदाहरणे जी ताराबाईंनी आजच्या पतिव्रतपणाबद्दल व्यक्त केलेली आहेत ती १८८२ मध्ये म्हणजेच १९व्या शतकात आणि आज आम्ही वाटचाल करीत आहोत ती २१व्या शतकाकडे. पण ही पुढील शतकातील परिस्थिती ताराबाई किती डोळसपणे न्याहाळतात व ते या परिस्थितीनुसार अगदी योग्य प्रकारे आजच्या स्त्रीधर्माला लागू पडत याचे आश्चर्य वाटते.

आजची स्त्री सुशिक्षित आहे. ती आपल्या नवऱ्याच्या खांद्याला खांदा भिडवून नोकरीसाठी बाहेर पडते. संसाराला हातभार लावते. ती नवऱ्याला देव म्हणून स्वीकार करणारच नाही. जर का पति देव तर पत्नी देवी असेल. कारणा दोघांचा हातभार संसारात समप्रमाणातच आहे. ती त्याच्या सेवेला हजर राहिली तर त्यानेही तिची तशीच सेवा केली पाहिजे. हा जसा स्त्रीधर्म तसा तो पतिधर्म असेल. " पतिव्रत्यपणा" या शब्दाला तर अलिकडे अर्थच राहिलेला नाही. कारण विज्ञान इतके पुढे गेलेले आहे की, स्त्री धर्म, पतिव्रतापणा धर्मशास्त्र यासारख्या गोष्टी भोंदूपणाच्या वाटतात. शिक्षणाने लोकांची मते

इतकी ज्ञानी व विस्तृत झालेली आहेत की या सर्व गोष्टी त्याना "अंधश्रध्दा" वाटतात. व जिथे जिथे अंधश्रध्दा बोकाळलेली आहे तेथे मात्र काही भागात असे प्रकार दिसून येतात. पण "अंधश्रध्दा" निर्मूलन समिती सारख्या संघटना आजकाल ठिकठिकाणी स्थापन होवून धर्माच्या नावाखाली चालणारा भोंदूपणा उघडकीस पडून तेथे सुधारणा केली जात आहे. अगदी असेच वर्तन ताराबाईंचे १९व्या शतकात दिसून येते. ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या बुध्दिला देखील पारंपारिक धर्माचा पगडा व त्याचा भोंदूपणाा पटलेला दिसत नाही. म्हणूनच त्या इतक्या प्रखरपणे आपली लेखणी चालवितात. हा त्यांचा शूरपणाच म्हणाला लागेल.

## २.६ स्त्रीधर्म व पतिव्रतापणा सिध्द करणाऱ्या शास्त्रपुराण पोथ्यावर टिका :

ताराबाईंची दृष्टी ही घारीसारखी चोहोबाजूला फिरणारी होती असे दिसते. १९व्या शतकातील स्त्रीधर्माच्या ज्या कल्पना मांडलेल्या होत्या त्या शास्त्रपुराण पोथ्या यांच्या जोरावर उड्या मारून बनविलेल्या होत्या. पण ताराबाई अशी काही शास्त्रपुराणांचे दाखले देतात की शास्त्रावर उड्या मारणाऱ्यानी तोंडघशी पाडतात. त्या म्हणताता की,

"शास्त्रकर्त्यांनी ज्या पूर्वयुगात झालेल्या पतिव्रता निवडून काढल्या, त्यातून एक दोघी तिघी तर दोषास पात्र असूनही, त्यांची तिकडे पहिली वर्गातच योजना केली हे कसे बरे ? आता द्रौपदी पाच नवऱ्याची बायको असुनही कर्णमहाराजांचे आंतर्यामी चिंतन करीत होती की नाही. अहिल्या" (गौतमाची बायको असूनही इंद्र केवळ तिच्यावर असलेल्या प्रेमापोटी गौतमरूपाने येवून अहिल्येचा उपभोग घेत असतो) शिळा होवून पडली. कुंती व सत्यवती

यानी कुमारदशेतच एकीने कर्ण व एकीने श्रीवेदव्यास असे दोन पुत्र प्रसवल्या तरी पटांतच नांव. वारे देव ! वारे ऋषी ! एकाचडी एक. [१६]

शास्त्र आणि पुराणांचे दाखले देवून ताराबाईनी शास्त्रकर्त्यांवर जी टिका केलेली आहे तो आजच्या युगात देखिल जो शास्त्र आणि पुराण वाचत नाही त्यालाही ज्ञान करून देण्यास अत्यंत उपयोगी पडते. खरे तर ताराबाईच्या काळात कुणालाही धर्माविरूध्द जाण्यास पारंपरिक रूढींच्या विरूध्द जाण्यास हिंमत नव्हती. त्याकाळात ताराबाई शास्त्रपुराणातील दाखले देवून स्त्रीधर्म व पातिव्रतपणा हा किती भोंदूपणाचा आहे हे पटवून देतात. खरोखरच असे वाटते की, ताराबाई त्या काळाच्या मानाने खूपच वाचन करणाऱ्या विचार करणाऱ्या असाव्यात. त्यांचे लेखन तत्कालीन समाजाला हदरवून सोडणारे होते. यात काही वादच नाही.

## २.७ ताराबाईनी पाहिलेले विधवांचे कारूण्यमय जीवन :

ताराबाईनी आपल्या लेखनीद्वारे विवाहित स्त्री ची अवस्था. स्त्रीधर्म व पातिव्रत्य याचे पालन करता करता दयनीय झाली होती. हे दाखवता दाखवता त्या तत्कालीन समाजातील विधवा स्त्रीची अवस्था तर कुत्र्याच्या जीवनापेक्षा वाईट परिस्थितीचे होते हे ही दाखविलेले आहे.

ताराबाईनी आपला लेखन प्रपंच सुरू केला तो एका विधवेवर ओढवलेल्या प्रसंगाबद्दल छापून आलेल्या वृत्तपत्रातील बातमीमुळे कुणी सुरतेच्या विजयलक्ष्मी नावाच्या २४ वर्षीय विधवेने अनैतिक संबंधातून झालेल्या मुलाची भ्रुणाच्या केली म्हणून तिला

फाशीची शिक्षा. पण काही समाजसुधारक व संस्थांच्या मध्यस्थीने तिला पाच वर्षे सक्तमजूरीची शिक्षा सुनावण्यात आली आणि त्यानंतर पुणे वैभव सारख्या सनातनी वृत्तपत्रानी स्त्री जातीविरूध्द उठविलेली टीकेची झोंड हे या निबंधाचे तत्कालीन कारण आहे. विजयालक्ष्मीचा खटला ज्या प्रकारे चालला वृत्तपत्रात त्याला जी प्रसिध्दी मिळाली त्यामुळे ताराबाईना अस्वस्थता आली आणि स्त्रीकडे पाहण्याची समाजबांधवांची दृष्टी आणि स्त्रीजातीला बदनाम करण्याची त्यांची वृत्ती यामुळे त्यांना लेखनप्रेरणा मिळाली.

ताराबाईंच्या मते विधवा स्त्रीच्या हातून जे अनर्थ घडतात त्याचे कारण ही ताराबाई सांगतात , "अहो, पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोग्याप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसकसे भोगीत असतील व भोगितात व त्यापासून कसकसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पना सुध्दा करता येत नाही. कारण मनोनिग्रह करून मनुष्य वस्तीत राहून स्त्री धर्मरक्षण होणेच नाही. मनाने व नेमाने तरी त्या दोषाला पात्र होतातच. एक केशपवन केले, दुसरे कुंकू पुसून सर्व सौभाग्य हिसकून घेतले म्हणून काय झाले ? त्यांचे अंतःकरण बरे वाईटाचे विचार त्यांचेजवळच आहेत. " [१७]

१९व्या शतकाचा पूर्वाधात बालविवाह पध्दती रूढ होती. त्यामुळे बालविधवांचे प्रमाण अधिक होते. त्यांचे केशपवन करून केवळ देवदेव करीत त्याना दिवस काढावे लागत असे. पुनर्विवाह म्हणजे महाभयंकर पाप असे समजले जाई आणि त्यातून एखादा अनर्थ जर का तरूण विधवांच्या हातून घडलाच तर त्या विधवांची निंदानालस्ती होत असे आणि याचे मुख्य कारण म्हणजे विधवा पुनर्विवाहास बंदी हेच होतो आणि याचे प्रमुख कारण म्हणजे हिन्दूंची शास्त्रे. याबाबत डॉ. सं.ग. मालशे म्हणतात,

" याचे मुख्य कारण म्हणजे हिन्दूंची शास्त्रे आणि धर्माच्या नावाखाली वज्रलेप बनलेल्या रूढी. हिन्दू शास्त्रानी स्त्रीवर अनन्वित बंधने लादून पुरूषाला मात्र मोकळे रान सोडलेले होते. आधी हिन्दूची शास्त्रे अनेक त्यात परस्पर एकवाक्यता नाही. " [१८]

१९व्या शतकात विधवापुनर्विवाहास शास्त्राने व धर्माने बंदी घातलेली होती व ही चाल महानरोग्याप्रमाणे सर्व जातीत पसरली होती पण त्यामुळे किती भयानक अनर्थ या विधवांच्या हातून घडतात हे ताराबाईनी जवळून पाहिलेले असावेत. तसेच वृत्तपत्रातही वाचलेले असावेत. ते त्यानी येथे व्यक्त केलेले आहे ते अगदी बरोबर आहे. स्त्रियांचे केशवपन केले आणि कुंकू पुसून टाकणे म्हणजे भांडे केवळ वरून घासून पुसून चकचकीत करण्यासारखे आहे. विधवा स्त्रियांच्या अंत:करणातील भावना कायमच्या दडपून टाकता येत नाहीत. हे सत्य या जगाच्या निसर्गाच्या नियमातच बसलेले आहे. जोपर्यंत हे जग आहे, जोपर्यंत तरूण विधवांचे पुनर्विवाह होत नाहीत तोपर्यंत हे अनर्थ घडत राहतील. तेंव्हा स्त्री केव्हा विधवा होईल हे कुणालाही माहित नाही. म्हणून ताराबाई काही मार्मिक प्रश्न विचारतात.

"अरे नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायको आधी मरावे याचा तुमच्या बापदादानी देवापासून कांही दाखला आणला काय रे ? मरणे किंवा जगणे हे तर त्या सर्व शक्तिमान नारायणाचे हाती. तुमचे हाती काय दगड आहे ? तरूणानी मरावे, म्हाताऱ्यानी जगावे याचा काही नेम आहे काय ? कोणी उपजताच कित्येक ऐन तारूण्याच्या भरात , कित्येक शंभर वर्षे या जगाचा पुरा अनुभव घेवून, कित्येक ऐन सुखाच्या वेळेत, कोणी राज्याच्या गादीस लाथ मारून यमाचे खडेदूर पाहतांक्षणीच क्षणाचाही विलंब न करता सर्व आपापली मुलेबाळे, बायका सोडून जातातच की नाही ? तेथे कोणाचा इलाज चालतो काय ?

मोठा राजा जरी असला तरी यमदूतापुढे त्याचे काहीच चालत नाही. मग तेथे या गरीब स्त्रियांचे कोण ऐकतो ? हा इश्वराचा मळा त्याला या स्त्रियानी काय करावे ? " [१९]

ताराबाई विचारलेले मरणाच्या ' बाबतचे ' प्रश्न अगदी दगडावरील रेषेप्रमाणे सत्य आहेत. जीवितांचे जन्म आणि मरण हे कुणाही, मानवाच्या हाती नाही. तर ते शक्तीमान नारायणाचे हाती. एवढे मात्र सत्य आहे. हे सत्य ताराबाईनी आपल्या लेखनीद्वारे मार्मिक प्रश्न विचारून सहजपणे स्पष्ट करून दाखविलेले आहे.

स्त्रीचे सौभाग्य एकदा गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे महान खून्याप्रमाणे अंधाऱ्या कोठडीत रहावे. त्याना पुनर्विवाहास बंदी पण पुरूषमात्र या कोणत्याही नियमात बसत नाहीत. म्हणून ताराबाईना अतिशय चीड येते म्हणून त्या पुरूषाना उद्देशून म्हणतात –

" तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंडे काळे करून दाढ्या मिशी भादरून यावत जन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे ? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे तो दाखवा बरे. जशी स्त्री तसेच पुरूष तुम्हीच कोण असे मोठे शूर म्हणून देवानी तुम्हाला इतकी मोकळीक दिली. " [२०]

ताराबाईनी पुरूषांच्या वर्तनांबद्दल जो प्रश्न उभा केलेला आहे तो आजच्या काळातील पुरूषालाही लागू पडतो तसे तत्कालीन विधवा स्त्रीचे जे चित्र व परीस्थिती त्यानी रेखाटलेली आहे ती आजच्या काळातही अशीच आहे. अजूनही अव्वलदर्जाचे मराठा देसाई, पाटील अशा घराणेशाहीतील विधवा स्त्रियांना पुनर्विवाहास बंदी आहे व इतर घराण्यातील स्त्रियांना लग्नसमारंभात जिथें जिथे सौभाग्यकारक समारंभ होतात तेथे या स्त्रियांना अजिबात विचारले

जात नाही. देवधर्माचे कार्य असल्यास प्रथम सौभाग्यवतीना बोलाविण्यात येते. विधवाना मिळावा तेवढा मान मिळत नाही. आजही हीच परिस्थिती आहे तेव्हा ताराबाईना जसा विधवांच्या वागणूकीबद्दल चीड आलेली आहे.

## २.८ स्त्रियांवर असलेली शास्त्रकर्त्यांची नजर व त्यावर ताराबाईनी घेतलेले आक्षेप :

१९व्या शतकात काय आणि आता काय स्त्री एकदा विधवा झाली की ती अभागी करंट्या कपाळाची तिचे तोंड पाहिले की अपशकून होतो ही विशेषणे अजून ही दिसून येतात. ताराबाईंनी आपल्या निबंधात म्हटल्याप्रमाणे त्या विधवेने काय देवाकडे या नवऱ्याला लवकर न्याहो असा अर्ज केलेला नसतो. पण पुरूषाची आयुष्यमर्यादा संपली की तो आपल्या बरे वाईटाचे देणे घेणे करून चालता होतो. पण त्याचा दोष बायकोला दिला जातो. ही परिस्थिती अजूनही आहे. पण जेव्हा बायका मरतात तेव्हा पुरूषाना कोणतेही विशेषण लावले जात नाही, त्या लग्नसमारंभात घेवू नका असे म्हटले जात नाही. ताराबाई म्हणतात " या कामात शास्त्रकर्त्यांनी तरी आपले अकलेचा फाटा लांब झोकून बरीच खर्ची घातली असती तरी त्यांची मोठी कुशलता झाली असती."[२१] पण असे झालेले नाही. कारण "आज जर शास्त्रकर्त्यांनी" कोणत्याही पुरूषाने एक प्रथम विवाहित बायको मेल्यावर पुन्हा लग्न करू नये, करील तो मातृगमनी, त्याला जातीभ्रष्ट करावे. असे केले असते नी कदाचित उद्या शास्त्रीबोवांच्या बायका एकदम जात्या तर त्यांनाही लोक असेच म्हटले असते. म्हणून

शास्त्रकर्त्यांनी आपली पीडा टाळण्याकरिताच, पुरूष जातीला एकीपासून पांचशे बायका करण्याची परवानगी दिली. " [२२]

आणि काय आश्चर्य आजही या शास्त्रकर्त्यांच्या नियमांचे उल्लंघन काही काही ठिकाणी व काही घरंदाज घराण्यात झालेली दिसत नाही. पुरूषाला विदूर म्हणून कधीच हिणवल जात नाही. विधवा स्त्रियांना लग्नसमारंभात पुढे पुढे करता येत नाही. पण विदूर पुरूष लग्नसमारंभात लग्नाचे मंत्र म्हणू शकतो. नवरा बायकोची सातजन्माची गाठ बांधू शकतो, त्याला कोणी विचारीत देखील नाही की बाबारे तू विदूर आहेत तू हे सौभाग्यकारक शुभ काम करू शकत नाहीस असे कोणीही सांगू शकत नाहीत. खरोखरंच याबद्दल मनात चीडनिर्माण होते.

## २.९ स्त्री शिवाय पुरूषाला किंमत नाही ताराबाईनी व्यक्त केलेली स्त्री ची महती :

ताराबाईंनी आपल्या निबंधात तत्कालीन काळात स्त्रिला जी निंद्य विशेषणे केली जात असे त्यांची यादी बरीच मोठी दिलेली आहे.

"स्त्री म्हणजे दुर्गुणांची पेठच.

स्त्री म्हणजे कपटाचे पात्र.

स्त्री म्हणजे अविचार कर्माचे नगर.

स्त्री म्हणजे संशयाचा परिभ्रम भोपळा.

स्त्री म्हणजे गोठणीतील म्हशीप्रमाणे मूर्ख.

स्त्री म्हणजे अल्पसंतोषी असतात.

स्त्री म्हणजे एक घरचा सोपा. आडगळ.

स्त्री म्हणजे स्वर्गाच्या दाराचा दगड स्वर्गमार्ग नाकारणारी. "[२३]

या सारख्या विशेषणांची यादी ताराबाईनी निमूटपणे सहन केलेली नाही तर प्रत्येक मुद्दा त्यानी खोडून काढलेला आहे. जी निंद्य विशेषणे स्त्रीला दिलेली आहेत त्या प्रत्येक विशेषणाचे मूळ पुरूषातच आहे. त्यामुळे ताराबाईंना खूप राग येतो व त्या स्पष्टपणे सांगतात की, स्त्री स्वत: होवून कधीच पुरूषाच्या गळी पडत नाही तर तिला प्रथम पुरूषच फसवतो. पण दोष मात्र स्त्रीच्या कपाळी लावतो. त्याचा ताराबाईना मनस्वी राग येतो आणि म्हणूनच त्या स्त्रीला एकूणच जीवनात किती महत्व आहे आणि स्त्रीशिवाय पुरूषाला किंमतच नाही हे विविध उदाहरणावरून सिध्द करून दाखवतात आणि विचारतात,

"अशी संबोधने तुम्ही ज्याना देता त्या स्त्रिया कोण बरे ? तुम्ही जन्म कोणाच्या पोटी घेतलात ? तुमचे नऊ महिने जीवासांड ओझे कोणी वागविले ? नेत्राचा दिवा व तळहाताचा पाळणा कुणी केला ? तुम्हाला प्राणापेक्षा जास्त जपले त्या तुमच्या आयाच नां ? तुम्हाला निरंतर भाऊदादा अशा मोठ्याने हाका मारतात त्या कोण तुमच्या बहिणीच नां ? ज्या तुमच्या सुखदु:खाच्या वाटेकरीण तुमच्या संसार दरबारच्या मुख्य प्रधान, तुमच्यावर मनोभावापासून प्रिती करणारी त्या तुमच्या बायका नां ? त्याही तरी स्त्रियाच आहेत नां ? का ह्या वेगळया करून आणखी दुसरी स्त्रीजाती आहे ? स्त्रिया म्हटल्या म्हणजे साऱ्याच मग तुम्ही अशी जी संबोधने देता त्यावरून तुम्हाला काय म्हणावे ? मातृद्रोही का मातृनिंदा करणारे म्हणावे ?" [२४]

ताराबाईनी खरोखरंच स्त्री जातीच्या सर्व रूपांचे ज्ञान संपादन केलेले होते. त्यांची निरीक्षक बुध्द तेजस्वी होती.स्त्री ही आई बहिण, बायको या नात्यात जरी आली तरी तिचे खरे स्वरूप हे स्त्री म्हणूनच चमकते. तेव्हा कोणत्याही रूपातील स्त्री ची निंदा ही सर्वच

स्त्रीच्या ला रूपाला लागू पडते. म्हणून ताराबाईना पुरूषानी केलेली स्त्री निंदा अजिबात पटत नाही. म्हणून पुढे स्त्रीच्या सौंदर्याबद्दल, अस्तित्वाबद्दल बोलताना म्हणतात,

"अरे जगनियंत्या परमेश्वराने आपल्या अगाध चातुर्याने ही सृष्टी नानाप्रकारच्या मनमोहक पदार्थांने भरली तरी त्यात धन व स्त्री हे दोन तर अतिशय मन ओढून घेणारे पदार्थ आहेत. त्यातून स्त्री तर पैशापेक्षाही अति वेधक असून तुमच्या जीवाला लक्ष्मीपेक्षा लक्षपट सुख देणारी आहे." [२५]

"देवासारख्यानी देवाची खुशांमत केली, तेथे तुम्ही कोण कोण्या झाडाचा पाला ? सर्वात वर्चस्व स्त्रीचेच. कारण सगळे तिचे स्वाधीन तिचेकरिता सारे वैभव, अरे स्त्रिया जर नसत्या तर झाडाची पाने चावीत रानोरान भटकत फिरला असता मग रोज पंचामृत पुढे आले असते." [२६]

"स्त्री जाती एक प्रतिशक्तीच आहे. तिच्यावाचून तुम्हाला शोभा, मोठेपणा, जय हे काहीच नाही. दूर कशाला ज्या घरात ती नाही ते घर केवळ स्मशानासारखे ओसाड दिसते. मग तो मोठा सर्व संपतीने भरलेला राजवाडा का असेना. त्याला तीच कळा. " पण ती जेथे वास करील ती मोडकी तीन वाशाची झोपडी जरी असली तरी एक मोठे शोभीवंत घवघवीत मंदीरच दिसेल. याकरिता स्त्रियांना लक्ष्मी असे म्हणतात. [२७]

खरोखरच ताराबाईनी म्हटल्याप्रमाणे स्त्री शिवाय या जन्माचे सार्थक होत नाही.

स्त्री ही खरोखरचं मोहक तर आहेच आणि धनापेक्षा सुख देणारी आहे. ज्या घरात स्त्री नसेल ते घर स्मशानासारखे वाटते. हे तर अगदीच बरोबर आहे. " स्त्री शिवाय घराला शोभा नाही आणि तुळशीशिवाय अंगणाला शोभा नाही" असा एक सुविचार आहे. तो

खरोखरच सार्थ आहे. ताराबाईनी एक स्त्री म्हणून स्त्रीकडे पाहिलेले आहे आणि स्त्रियांचे जीवनातील महत्व त्यानी जाणलेले आहे. आणि १९व्या शतकात स्त्री या विषयावरून जे वावटळ उठलेले होते ते खरोखरंच स्त्री आणि पुरूष या दोघांचा जीव एकच असताना केवळ पुरूषाला प्रत्येक क्षेत्रात मनमानी करण्यास मोकळीक आणि स्त्रियांना मात्र बंधने व दोषास पात्र ठरविण्याचे जे वावटळ उठलेले होते त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी त्यानी केलेला हा खटाटोप उल्लेखनिय आहे.

## २.१० ताराबाईनी व्यक्त केलेला स्त्रियांचा भोळेपणा :

ताराबाई त्या काळाच्या मानानी बऱ्या पैकी शिक्षण घेतलेल्या होत्या. वृत्तपत्र पुस्तके यांचे वाचन करीत होत्या. पण त्यांचे ज्ञान केवळ पुस्तकी राहिलेले नाही तर या निबंधाचा अभ्यास करताना आपल्याला हे ही जाणवते की त्यानी आजूबाजूचे सामाजिक जीवन डोळसपणे पाहिलेले आहे. स्त्रियांना जी वागणूक मिळकत होती पुरूषांची स्त्रियांवर असलेली जाचक नजर आणि स्त्रियांची ते सर्व मुकाट्याने सहन करण्याची सहनशक्ती या साऱ्यांचे त्यानी निरीक्षण करून त्या काळातील स्त्रिया किती भोळ्या होत्या याचे वर्णन केलेले आहे.

स्त्रियांचा स्वभाव एकंदर हेकेखोर भोळा असल्यामुळे कशावरही त्यांचा तेव्हाच भरवसा बसतो. त्या संतती संपत्ती व नवऱ्याची प्रीती संपादन करण्याकरिता काय करतील हे मात्र सांगवत नाही. याला उदा. एक वर्तमानपत्रात असे लिहिले होते की, एका बाईस मूल होत नव्हते. तेव्हा कोणी भोंदू देवरूषानी तिला लहान मुलाचे **** गुळाबरोबर खाल्ल्याने गर्भवती होशील असे सांगितल्यावरून तिने तशी संधी राखून ते नामी औषध घेतले. पुढे त्याचा बोभाट होवून नवऱ्याने तिची पाठ लाकडाने खूप नरम केल्यावर जनापवाद

चुकविण्याकरिता तिने जीव दिला. नवऱ्याची प्रिती ममता आपलेवर असावी. त्याने निरंतर आपले मर्जीप्रमाणे रहावे याकरिता कित्येक जोशी, कानफोट, बैरागी भोंदूलोक स्त्रियांना नादी लावून फसवितात. "लेकुरवाळे घर पाहून शनवारी पोर्णिमा साधून आग लाव म्हणजे तुला मुलगा होईल", "शनवारी काळोख्या रात्री न्हाऊन डोक्यावर भंदे घेवून वस्त्ररहित अकरा मारूतीचे दर्शन घे" असे नानाप्रकारचे थोतांड ऐकून त्यावर त्यांचा त्वरीत भरवसा बसून ते काम कितीही कष्टमय असले तरी त्या मागे पुढे पाहत नाहीत. यावरून त्या किती मूर्ख, अविचारी हे सहज ध्यानात येते." [२८]

स्त्रिया या खरोखरच भोळ्या, अविचारी आणि मूर्ख असतात हे १८८२ मध्ये ताराबाईनी पाहिलेले होते. पण आजही स्त्रिया फक्त पति व पुत्र या दोघासाठी साधु भोंदू बुवाबाजी देव जप तप या सारख्या गोष्टीमध्ये अडकलेल्या दिसून येतात. एकीकडे अंधश्रध्दा निर्मूलनासाठी प्रयत्न चालू असताना दुसरीकडे अगदी शिक्षित म्हणवून घेण्याचा स्त्रियाही या भोवऱ्यात अडकणाऱ्या कमी नाहीत याची साक्ष पोलीस टाईम्स सारख्या वृत्तपत्रातून अजूनही मिळतो. १८८२ मध्ये निदान शिक्षणाचा अभाव त्यामुळे स्त्रिया अज्ञानामुळे या अंधश्रध्देचा मागे लागल्या असतील म्हणता येईल. पण आज आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असतानाही सज्ञानी स्त्रिया अशा अविचारी होत असताना पाहून आश्चर्य वाटत.

## २.११ ताराबाईनी पाहिलेले स्त्रियांचे दुर्गुण :

स्त्रीपुरूष तुलना या निबंधात ताराबाईनी स्त्रिया व पुरूष यांत साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध लिहिलेला आहे. तरी देखील या निबंधाची लेखनप्रेरणा त्याना मिळाली ती विजयालक्ष्मी च्या खटल्यामुळे आणि त्या निमित्ताने त्यानी पुरूषांच्या दुर्गुणांची मिमांसा करून स्त्रियांच्या भोळेपणाचा फायदा पुरूष कसे घेतात हे सांगता सांगता

स्त्रिया कशा सर्वश्रेष्ठ आहेत त्या कितीतरी विचार आहेत, त्यांच्यातील सहनशक्तीची कमाल आहे हे सांगतात आणि त्याबरोबर स्त्रियांचे दुर्गुण ही त्या व्यक्त करतात. त्या म्हणतात,

"या जगातील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज अंतर्बाह्य गंगाजळाप्रमाणे निर्मळ आहेत असे मुळीच नाही. पण सर्व पृथ्वीवरील स्त्रिया गोळा केल्या तर तुमच्यासारख्या संशयाच्या भोवऱ्यात सापडलेल्या शेकडा दहा सापडतील." [२९]

"स्त्रियांची मने फार हलकी व अल्वसंतोषी असतात. स्त्रियांचा स्वभाव एकंदर भोळा असल्यामुळे कशावरही त्यांचा तेव्हाच भरवंसा बसतो." [३०]

ताराबाईनी स्त्रियांचे जे अवगुण येथे दिलेले आहेत ते अगदी बरोबर आहेत. ते आजही स्त्रियांच्या अंगी दिसून येतात.

## २.१२ स्त्री च्या अधोगतीला पुरूषच कारणीभूत :

स्त्री पुरूष तुलना या पुस्तकातील निम्म्याहून अधिक भाग पुरूषांच्या ठायी असणाऱ्या दुर्गुणांची मीमांसा करण्यात खर्ची घातलेला आहे. वस्तुत: पुरूष अनेक दुर्गुणांनी भरलेले असताही त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून दुर्गुणी म्हणून स्त्रियांनाच बदनाम करू पाहणाऱ्या पुरूषावर कठोर आघात करण्याच्या दृष्टीने ताराबाईनी आपली लेखनी मुक्तपणे चालविली आहे. नव्वद वर्षाच्या म्हातारपणीसुध्दा अल्पवयीन मुलीशी लग्न करणारे म्हातारे पहिली पत्नि निर्वताच दुसऱ्या लग्नाला सज्ज होणारे उतावळे नवरे, संतती नाही या सबबीवर एकीनंतर दुसरी, दुसरीनंतर तिसरी, चौथी बायको करायला उत्सूक असणारे श्रीमंत नवरे मित्राशीच संधान बांधून बांधणारे पुरूष, साधुसंन्याशी, बुवामंडळींचे दांभिक व बुवाबाजीचे वर्तन दक्षणेचे पैसे साठवून रांडेकडे जाणारे महाभाग या सर्वांची दखल ताराबाईनी घेतली आहे.

"प्रथम स्वधर्म सोडून मनमानेल तसे वर्तन करणे, दारू पिऊन रस्त्यात लोळणे, पोऱ्यांचे तमाशे पाहत फिरणे, जुवा खेळणे, गांजा वगैरे ओढणे, रांड ठेवणे इ. वाईट व घाणेरडी आचरणे तुम्ही करू लागला. आता रांडा कोण ? का ह्या कोणी दुसऱ्या देवाने केल्या ? रांडा या तुम्हीच फसवून घराबाहेर काढलेल्या स्त्रियापैकी स्त्रिया असतात. " [३१]

" पुरूषाच्या दगाबाजीचे वागणे तर ताराबाईना विलक्षण संतापजनक होते. पुरूष स्त्रियांना कशाप्रकारे फसवितात व सारा दोष स्त्रियांनाच देतात. स्त्री ला फूस लावून नाना प्रलोभने दाखवून मोहात पाडून, खोट्या नाट्या प्रेमाचा आभास निर्माण करून आपले मनोवांछित पुरे होईपर्यंत पुरूष तिच्यापुढे पुढे करतात आणि "एकदा तुमचीही दुष्ट कामवासनेची पूर्ती होवून स्त्री एकदा गर्भवती झाली" म्हणजे मग त्या यातना, ती काळजी, तिचे कडेच सोपवून विंचवासारखे ढेकळाआड लपवीत फिरता. तेंव्हा मग ती त्या ओझ्याखाली मर्णानमुख झालेली दीनवदनी हरणी त्या व्याघ्ररूपी मानवाघमास आता कसे करावे हो असे जर म्हणाली तर या दुष्टाचे तोंडून जसा काही सावच बोलतो असे शब्द बाहेर पडावयाचे. "आता आम्ही काय करावे, तू केलेस ते भोग. " [३२]

अशाप्रकारे स्त्रियांच्या भोळेपणाचा फायदा पुरूष घेवून स्त्रियांना फसवितात. त्याना ना जीवंत राहण्यात सुख ना मरण्यात सुख अशा प्रकारच्या पुरूषांची कमतरता आज ही या दुनियेत काही कमी नाही. जी १८८२ मध्ये ताराबाईनी न्याहाळलेली आहे. अशा पुरूषांचा ताराबाईना उद्वेग येतो व त्या म्हणतात,

"तुमच्यापेक्षा सर्प बरा, तो डसल्याबरोबर प्राण तरी जातो. पण तुमचेजवळ जे विष आहे, ते नित्य नित्य शरीरास असह्य दुःख देवून प्राण घेते." [३३]

अशाप्रकारे पुरूषांच्या दुर्गुणांची नित्य नवनवीन उदाहरणे आढळत असताही स्त्रियावरच दोषादुर्गुणांचे आरोप होत राहतात. त्यामुळे ताराबाईंचे अंत:करण अतिशय

दु:खीकष्टी होते आणि त्यांची लेखनी उघडपणे स्पष्ट करून दाखविते की स्त्रियांच्या हातून जे अनर्थ घडतात विशेष करून विधवा स्त्रियांच्या हातून जे अनर्थ घडता त्याला मुख्य कारण म्हणजे पुनर्विवाहास बंदी हेच होय.

## २.१३ विधवा पुनर्विवाहास बंदी व त्यापासून होणारे अनर्थ :

ताराबाईंचा लेखनप्रपंचमुळे विजयालक्ष्मी नामक विधवेला भ्रूणहत्या केल्याच्या आरोपावरून झालेली शिक्षा. याचा विचार करता करता ताराबाईंना त्याचे उत्तर सापडले आणि ते म्हणजे त्याकाळातील बालविवाह व त्यामुळे कधी कधी ऐन जवानीत स्त्रिया विधवा होत असत. केशवपन केले जाई. कुंकू पुसला जाई. पण त्यांचे अंत:करण त्याचे बरेवाईट विचार व नैसर्गिक वासनांचे अस्तित्व हे त्यांच्याजवळ असणारच असे ताराबाईना वाटते. या ताराबाईंच्या सुक्ष्म निरीक्षणाचे कौतुकच करावे लागेल. अगदी सुरवातीलाच त्या म्हणतात,

"अहो पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगाप्रमाणे अनेक ठिकाणी अनेक जातीत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दु:ख कस कसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पनासुध्दा करता येत नाही. कारण मनोनिग्रह करून मनुष्य वस्तीत राहून स्त्री धर्मरक्षण होणेच नाही." [३४]

१९व्या शतकात धार्मिक रूढी परंपरा यांच्या जाळ्यात माणूस अडकलेला होता. अशा काळात विधवा पुनर्विवाह म्हणजे पाप, धर्म व परंपरांच्या विरूध्द वर्तन अशाप्रकारच्या कल्पना समाजात रूढ झालेल्या असल्या पाहिजेत. त्यामुळे विधवा पुनर्विवाहास बंदी होती. पण तरूणविधवा स्त्रिया सहाजिकच दैहिक गरजा भागविण्याकडे झुकलेल्या दिसतात. स्त्रिच्या नैसर्गिक कामना अमानुष रूढींच्या दाबाखाली दडपून टाकू पाहणाऱ्या पुरूष वर्गाला त्यानी असा अगदी सरळ व तर्कशुध्द सवाल केलेला आहे.

" पुरूषविरहीत स्त्रियांस तरी कसे सुख होईल बरे ? जी तुमची दशा तीच तिची तिलाही किती मोठ्या ऐश्वर्यात एकटी ठेवा म्हणजे पहा तिची कशी दशा होते ती ! "[३५]

नैसर्गिक वासनांचे अस्तित्व – त्यांच्या पूर्तीची गरज व त्या अनैसर्गिकपणे दाबल्यास अनीतिकारक वर्तन होणे स्वाभाविक आहे. हे स्त्रीपुरूषांत दोघांतही सारखेच आहे. हे सांगताना ताराबाई उदाहरण देवून स्पष्ट करतात त्या म्हणतात,

"ईश्वराने हा जोडा स्वेच्छेने नेमिला आहे. पहा पक्षापासून तो निर्जिव झाडाझुडुपात देखील त्यानी स्त्री जाती निर्माण केली आहे. प्रत्येक गोष्टीला जिनसेला दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावाचून शोभाच येत नाही. "[३६]

१९व्या शतकात एक स्त्री, समाजात विधवा स्त्रियाकडून झालेल्या अनर्थाचे विश्लेषण एवढा नैसर्गिक कामवासनेचा पूरोगामी विचार मोकळेपणाने मांडते ही गोष्ट खरोखरंच आश्चर्यकारक वाटते. आणि पुढे त्या लिहितात, पुरूषानाच तेवढे पुनर्विवाह करण्यास मोकळीक का ? तसेच त्याला एकीपासून पाचशे बायका करण्यास मोकळीक हे शास्त्रकर्त्यांनी केल्यामुळे त्यांच्यावरही त्या खरपूस टीका करतात. तसेच पुराणातील पुनर्विवाहाचे उदाहरण देताना म्हणतात, " तारा ही वालीवानराची बायको असूनही धाकटा भाऊ सुग्रीवाची बायको रूमा हिला आधीच घरात घालून बंधु सुग्रीव बांदरोबा यास हाकून लावले पुढे रामचंद्र महाराज भेटले तेंव्हा त्यानी सुग्रीवाची कीव करून वालीला कपटाने मारून ताराचे लग्न सुग्रीवाबरोबर लावू लागले तेंव्हा ती बिचारी म्हणाली, की महाराज हे कसे ? धाकटा दीर म्हटला म्हणजे मुलासारखा, मला हे अनुचित दिसते. तेंव्हा रामचंद्रानी सांगितले की, काही चिंता नाही. तु धाकट्या दिराबरोबर पुनर्विवाह केलास तरी तूझे नांव पातिव्रतेमध्येच गणले जाईल. हे इतके झाले ते श्रीधर स्वामीनी लेखणीचे दोन टाक आधीच मारीले की, देवानी केले त्याला काही हरकत नाही. "[३७]

असे हे उदाहरण देता देता ताराबाई पुरूषाना विचारतात,

"अरे तुम्ही सिंहासारखे धैर्यवान, भगीरथासारखे महाप्रयत्नी, तुम्ही निधडे शौर्यशाली वीर बनून महान महान अजिंक्य शत्रूस जिंकून त्यास बकरे करून सोडलेत." [३८]

सांगायचे तात्पर्य म्हणजे पुरूषाची ताकद प्रचंड असते. तिचा उपयोग योग्य ठिकाणी केल्यास सर्वत्र आनंदी आनंद होईल. म्हणून त्या शूरवीराना प्रश्न विचारतात,

"असे तुम्ही बलाढ्य पराक्रमी असताना गरीब विधवा स्त्रियांना या लज्जेच्या दरीतून ओढून सर्व जातीला मोडून एकदम त्यांच्या कपाळी सौभाग्याचा मळवट भरून सौभाग्यशाली करण्यास तुमच्याने पुढे होववत नाही काय ?" [३९]

खरोखरच विधवां स्त्रियांना पुन्हा सौभाग्य प्राप्त करून देण्यासाठी देवलोकांच्यात देखील प्रयत्न करण्यात आले. तसेच १९व्या शतकात काय आणि त्याहीपुढील शतकात काय जर का खरोखरंच पुरूषानी धैर्य करून त्याना सौभाग्याचे लेण दिले त्याना सहारा दिला तर त्यांच्या हातून कोणताच प्रमाद घडणार नाही व अनर्थही घडणार नाहीत हे मात्र सत्य ताराबाईने उकललेले आहे.

## २.१४ तत्कालीन साहित्यकृतीतील स्त्रीचित्रणातील भाष्य :

ताराबाई शिंदेच्या काळात ज्या ज्या स्त्री चरित्रावरील साहित्यकृती होवून गेल्या त्यांचे वाचन ताराबाईनी अगदी डोळसपणे केलेले दिसते.

'मुक्तामाला' व 'मंजूघोषा' या दोन कादंबऱ्या आणि मनोरमा नाटक त्यानी विचारात घेतलेले आहे. यापैकी मनोरमा १८७२ मध्ये महादेव बाळकृष्ण चितळे यानी लिहिलेले होते. ते नाटक ताराबाईनी फारच जवळून व अभ्यासवृत्तीने न्याहाळलेले दिसते. यात नाटकातील चारही प्रयोग स्त्रियांच्या चरित्रावरच आहेत. ते येथे व्यक्त करतात,

" पहिल्या प्रयोगात मनोरमा व गणपतराव हे उभयंता सुशिल सुशिक्षित असल्यामुळे त्यांचा शेवट चांगला झाला. "

दुसरे गोंदूबाई व रामराव फडणीस हे जोडपे अगदी विजोड असून तरण्या बायका म्हाताऱ्या नवऱ्याची कशी हेळसांड करतात त्याला किती तुच्छ मानतात हे दाखविले आहे. पुढे रामरावाच्या मागे गोंदूबाईने गुण उधळीले ते वेगळे.

तिसरे हीनवर असल्यामुळे विनायकरावांची बायको गंगू सरस्वतीबाईच्याद्वारी लुच्छांच्या नादी लागून कराचीस पळून जाऊन उघड कसबीण बनली. कसबीणीची ममता, त्याचे आर्जव गोडबोलणे, शपथा आणात किती खरेपणा असतो हे व शेवटी त्यांचे परिणाम कसे होतात हे सांगितले आहे.

चौथे - रामभटजीची सून ठकू ही विधवा असून गर्भवती झाल्यावर सर्व सोहाळे होवून मुंबईत बाटलीवाल्याचे इस्पितळात संयोगजन्य दुःखाने अतिशय दुर्दशेत मरण पावली.[४०]

हे सर्व प्रकार नाटककाराने सिध्द करून दाखविले खरे पण ताराबाईना यांवर विश्वास नाही म्हणून त्या म्हणतात की, " सगळ्यांच घरी कोणाची बहीण, आई सून लेक विधवा असेलच की नाही तर एकीला बट्टा लागला म्हणजे सरसकट सगळ्याच त्यात आल्या की नाही तेंव्हा यात काय सार्थक झाले ? "

म्हातारपणी लग्न करतील मग त्यांच्यामागे उघड म्हणा किंवा झाकून म्हणा त्याचा फजिता होणारच होणार यात संदेशा नको.

तसेच हीनवर म्हणून स्त्रिया निघूनच जातील हे ही अशक्यच आहे. कारण आज अशाच निघू निघू जात्या तर हे सर्व जग या उनाड बायकानी भरून गेले असते."[४१]

असे मार्मिक मत ताराबाई व्यक्त करतात. तेंव्हा ताराबाईनी दिलेले मनोरमेबद्दलचे आपले विचार आज ही पटतात. यावरून ताराबाईचे सामाजिक व साहित्य दृष्टीकोन किती खोलवर आहे हे दिसून येते. मराठी साहित्यातील पुरूषानी केलेल्या स्त्रीचित्रणाचा चिकित्सक परामर्ष घ्यावा ही घटना समीक्षेच्या इतिहासात महत्वाची वाटते.

स्त्री व पुरूष संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. ती समान असणे आवश्यक :

स्त्री पुरूष तुलना या निबंधाच्या शेवटी ताराबाईंचा सूर अत्यंत नम्र झालेला आहे. व या प्रपंचात स्त्री आणि पुरूष याना एकमेकांची कशाप्रकारे गरज आहे हा संसाराचा गाडा हाकण्यासाठी दोघांचीही गरज आहे हे आवर्जून सांगतात.

"स्त्री ही अर्धांगी शक्ती आहे. पाहू बरे तुम्हाला अर्धांग वायू होवून अर्धे शरीर जर गेले तर मग एका हाताने तुम्ही काय कराल ? हा संसाराचा गाडा तुम्ही भरावा. पुढे तो हाकून त्याची सर्व व्यवस्था लावणे तिच्याकडे . अशी ही स्त्री जाती एकप्रकारे शक्तीच आहे. तिच्यापासून तुम्हाला शोभा मोठेपणा, जय हे काहीच नाही." [४२]

खरोखरच संसार हा एक रथच आहे. स्त्री व पुरूष ही त्याची दोन चाके आहेत. त्यातील एक चाक मोडले तर रथ कलतो. त्याची शोभा कमी होते. जीवनात जर खरे सुख भोगायचे असेल तर स्त्री व पुरूष (नवरा बायको) यांची बरोबरीने गरज आहे हे ताराबाईनी संसाराचे मर्म अगदी अचूकपणे ओळखले होते. तरी देखील जाता जाता पुन्हा स्त्रियाना उपदेश करतात, की स्त्रीमुळे मोडकी तीन वाशाची झोपडीसुध्दा घवघवीत मंदीर वाटते म्हणून तिला लक्ष्मी म्हणतात. तेव्हा स्त्रियांना त्या म्हणतात,

"स्त्रियास अगदीच अमर्याद मनमानेल तशी मोकळीक असावी असे अगदीच म्हणणे नाही." अशिक्षित अज्ञानी, निर्बल अशा जरी त्या आहेत तरी त्यानी आपल्या दृढ निश्चयाचे बळाने सदा सदाचरणी अग्निसारखे शुचिर्भूत अंतरबाह्य निर्मळ राहून पुरूष जातीस लाजवून

खाली पाहण्यास लावावे. या वेगळे त्यांच्या लक्ष्मी या नावास साजण्याजोगे दुसरे भूषणच नाही. "[४३]

ताराबाई स्त्री व पुरूष या दोहोमध्ये साहसी कोण ? हे सिध्द करून दाखविण्यासाठी जरी हा लेखनप्रपंच केलेला असला तरी त्यानी स्त्रियाना पदोपदी उपदेश केलेला आहे. हा त्यांचा पुरूषाचा आदर करण्यामागचा कल दिसतो. स्त्री व पुरूष यांच्यात त्यानी व्यवस्थित संतुलन ठेवलेले आहे. हे कौतुकास्पद आहे.

ताराबाईनी निबंधाच्या शेवटी जीवनात सुखच सुख आनंदच आनंद या जगात प्रत्येक घरात पातिव्रत्याचे निष्कलंक निष्पाप अवतरेल अशी अपेक्षा करतात म्हणून शेवटी देवाची करूणा भाकतात आणि म्हणतात, "या सदा पतिव्रता सदाचरणी बाण्याने दोन्ही कुळात बिजलीप्रमाणे चमकत राहण्याकरिता व त्यांचे सुकीर्तीचे ध्वज दोन्ही कुलमंदिरावर उंच उडविण्याकरिता सर्व मुलाबाळानासुध्दा लक्ष्मीच्या पूर्ण वैभवात त्याना नांदवून सर्वास प्रिय होवून सौभाग्याचा मळवट कपाळी भरून त्यांचा संसार शेवट गोड होवून इहलोकी व परलोकी त्याना सुस्थळ मिळण्याकरिता आनादि सिध्दपरम कृपाळू दयानिधि करूणाकर दिनबंधु जगनियंत्या परमेश्वराची प्रार्थना यांचे कल्याण होण्याकरिता मनापासून करून हा निबंध संपविते."[४४]

खरोखरच स्त्रीबद्दल स्त्रीला इतके प्रेम असावे ही नवलाईची गोष्ट आहे. प्रस्तुत निबंधात ताराबाईनी स्त्री एक आदिशक्ती आहे सिध्द करून दाखवता दाखवता शेवटी स्त्री सुखी व्हावी दोन्ही कुळात तिचा उध्दार व्हावा हे पाहण्यासाठी त्यांचे मन आसुसलेले दिसते. तेव्हा हे ताराबाईंचे विचार पाहता असे म्हणावेसे वाटते जेव्हा स्त्री आपले जीवन आनंदाने

सुखाने निष्कलंक समाधानकारक जगू लागेल त्याचवेळेस कै. ताराबाईंच्या आत्म्याला शांती लाभेल.

## २.१५ समारोप :

"स्त्रीपुरूष तुलना" या निबंधात्मक पुस्तकातील दुसऱ्या प्रकरणात ताराबाईनी स्त्रीविषयक विचार अगदी मार्मिकपणे व्यक्त केलेले आहेत. येथे विधवा स्त्री व विवाहीत स्त्री यांच्या जीवनप्रसंगांचे एकेक प्रकरण मार्मिकपणे उलघडून दाखविले आहे. भारतातील कुटुंबव्यवस्था आणि १९व्या शतकातील विवाहाच्या तऱ्हा, रूढी परंपरा यांचा 'स्त्री' वर होणारा परिणाम विचारपूर्वक व्यक्त केलेला आहे.

ताराबाई शिंदे यांचे "स्त्रीपुरूष तुलना" हे मराठीतील असे पहिले लेखन आहे की ज्यात एक स्त्री केवळ धीटपणेच नव्हे तर सुसंगतपणे, तर्कशुध्दरीतीने परखड शब्दात स्त्रीपुरूष नात्यासंबंधी व तिच्या अखंड शोषणासंबंधी पुरूषाना सरळ सरळ प्रश्न विचारत आहे. या प्रश्नातील काही प्रश्न ऐतिहासिक तर काही राजकीय तर काही धार्मिक स्वरूपाचे आहेत. स्त्री ही दीर्घकाळ सत्तेपासून दूर ठेवली गेली आणि ब्रिटीश राजवटीत तर ती सत्तास्थानापासून आणखीच दूर फेकली गेली. ताराबाईनी स्त्रीच्या संदर्भात अगदी व्यवहारिक स्वरूपाचे प्राथमिक पातळीवरचे परंतु मूलभूत असणारे प्रश्न उपस्थित केले आहेत.

विधवा विवाहाशी संबंधित नियंत्रणे त्यामुळे होणारे दुष्परिणाम कौटुंबिक राजकारण, सामाजिक जीवनातील लग्नाच्या पध्दती व त्याचे दोष स्त्रीला दैनंदिन जीवनात पडणारे पेच विधवांचे सामाजिक व धार्मिक क्षेत्रात होणारे हाल अशा अनेकानेक प्रश्नाशी "स्त्रीपुरूष

तुलना"ची संहिता संबंधित आहे. पुरूषांच्या अंगी असलेले दुर्गूण, स्त्रीला कलंकीत करण्यास कसे कारणीभूत होतात याची मिमांसा केलेली आहे. तत्कालीन परिस्थितीत वाङ्.मयकलाकृतीतून होत असणाऱ्या स्त्रीचित्रणाबद्दलचे त्यांचे तीव्र असमाधान अभिजात साहित्य व व्रत्तपत्रे यामधून साकार होणारी स्त्रीप्रतिमा, स्त्रीच्या वर्तनाबाबत केले गेलेले नियम त्याला सहाय्यभूत ठरणारा शास्त्रांचा आधार या सगळ्यामुळे ताराबाईना पुरूषाना वेगळा न्याय व स्त्रीला वेगळा न्याय असे का ? हा प्रश्न पडतो. स्त्रिया ही पुरूषांची 'उपजात' असल्यासारखी वागणूक पाहून त्याना खूप संताप येतो. म्हणून त्या धर्माला शास्त्राला आणि देवानासुध्दा तुच्छ मानतात. समाजसुधारकाना तर त्या इसापनितीतील 'उंदिर' अशीच उपमा देतात. पुरूष शतश: कपटानी व्यापलेले आहेत ते पाहून त्यांचे मन अस्वस्थ होते. एक बायको मेली की दुसरी बायको पण 'स्त्री' ने मात्र बालवयात देखील एक नवरा मेला तर दुसरा नवरा नाही. बायकोने सती जावे पण नवऱ्याने नाही. स्त्रीला व्यभिचारातून मूल झाले तर तिला सजा पुरूषाला नाही, स्त्रीने इकडे तिकडे नजर फिरविली तर ती पतिता – रांड. पण पुरूषाने अन्य माणसाची अभिलाषा धरिली तर तो पौरूष अशा प्रकारे स्त्रीचे अधिकार व पुरूषाचे अधिकार यात भेद करणारी जी मूल्यव्यवस्था आहे तिलाच ताराबाईनी आव्हान दिले आहे. स्त्री ही दोषाने भरलेली दुर्गुणानी संपन्न असलेली मूर्ती असे संपूर्ण पुरूष जातीने संबोधिल्यामुळे ताराबाई मनोमन दु:खी होतात. खजिल होतात. म्हणून त्यानी "स्त्री" एक महान शक्ती आहे. तिच्याशिवाय मानवजातीला पूर्णत्व नाही. तिच्याशिवाय जीवनाचा गाडा पुढे जात नाही. स्त्री ही घरची लक्ष्मी आहे. तिला दोन्ही कुळात सुखसंपन्न लागो अशी प्रार्थना देवाकडे करतात. ताराबाई शिंदे इंग्रज सरकारला ईश्वर मानतात. कारण त्यांच्यामुळे सतीची चाल बंद झाली आणि स्त्रीशिक्षणास आरंभ झाला. त्यामुळे धार्मिक व सामाजिक जीवनात बरेच बदल घडून आले. येथे ताराबाई खुष दिसतात. पण संबंध निबंधात "स्त्रीपुरूष" गुण अवगुणांची तुलना करतात करता पुरूषप्रधान संस्कृतिचा धिक्कार केला आहे

व स्त्रीची नम्रता तिचे मोठेपण अतिशय कणखर शैलीत व्यक्त करून संपूर्ण भारतीय स्त्रियांचा अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक समस्येवर प्रकाश टाकून पुरूषसत्ताक व्यवस्थेची बारीक चिकित्सा करण्याचे धाडस ताराबाईनी दाखविले आहे. तसेच पुरूषाना देवपुल्यत्व बहाल करणाऱ्या परंपरेला आव्हान देवून, अन्यायपुरूषी शक्तीशी दोन हात करण्याचे वैचारिक धाडस दाखविले हे त्यांचे मोठेपण आहे. तसेच पुरूषाची दगाबाजी उघडी करून स्त्रीपुरूष समानतेची ग्वाही देणारे पुस्तक त्यानी सिध्द केले. म्हणूनच त्यांच्या लेखनाला पुरूषानी चालविलेल्या स्त्री शोषणाविरूध्द फुंकलेली "तुतारी " असे म्हणावेसे वाटते.

जुने जावू द्या
मरणालागूनी
जाळूनि किंवा पुरूनी टाका

असा विचार त्याना अभिप्रेत आहे.

*****

## संदर्भ ग्रंथ

१) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, पृ.क्र. १, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, प्र.आ., १९९७.

२) लोकहित वादीची शतपत्रे - संपादक - प्रियोळकर, १९६७, पृ.क्र. ३१, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, प्र.आ., १९९७, पृ.क्र. २५.

३) तत्रैव, पृ.क्र. २६, २७.

४) तत्रैव, पृ.क्र. २७, २८.

५) तत्रैव, पृ.क्र. २८.

६) तत्रैव, पृ.क्र. ३०.

७) शिंदे ताराबाई, स्त्रीपुरूषतुलना, १८८२, संपादक - नागनाथ कोतापले, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, १९७५, दुसरी आ., पृ.क्र. २०.

८) शिंदे ताराबाई, स्त्रीपुरूषतुलना, १८८२, संपादक - नागनाथ कोतापले, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, १९७५, दुसरी आ., पृ.क्र. २१.

९) शिंदे ताराबाई, लिखित स्त्रीपुरूष तुलना, संपादक - स.गं. मालशे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९७५, पृ.क्र. २ (प्रस्तावना).

१०) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, पृ.क्र. १, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. २७, २८.

११) तत्रैव, पृ.क्र. २७, २८.

१२) तत्रैव, मूळसंहिता, पृ.क्र. ३, विलास खोले संपादित.

१३) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, पृ.क्र. १, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. २.

१४) तत्रैव, पृ.क्र. ३.

१५) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, १८८२, संपादक - स.ग. मालशे, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७५, प्र.आ., पृ.क्र. ३.

१६) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, पृ.क्र. १, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. १.

१७) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, १८८२, संपादक - स.ग. मालशे, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७५, प्र.आ., पृ.क्र. ५.

१८) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, १८८२, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. १०, मूळसंहिता.

१९) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, संपादक डॉ. नागनाथ कोतापल्ले, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९२, प्र.आ., पृ.क्र. ८.

२०) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, १८८२, विलास खोले संपादित स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. १२.

२१) तत्रैव, पृ.क्र. १३.

२२) तत्रैव, पृ.क्र. ४४.

२३) तत्रैव, पृ.क्र. ४४.

२४) तत्रैव, पृ.क्र. ७.

२५) तत्रैव, पृ.क्र. ४७.

२६) तत्रैव, पृ.क्र. ४८.

२७) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूषतुलना, मूळसंहिता, संपादक - डॉ. स.गं. मालशे, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, द्वि.आ., १९७५, प्र.क्र. ३४, ३५.

२८) तत्रैव, पृ.क्र. २३.

२९) तत्रैव, पृ.क्र. २५.

३०) शिंदे ताराबाई - स्त्री पुरूष तुलना, १८८२, संपादक - विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. पृ.क्र. ३५.

३१) तत्रैव, पृ.क्र. ४२.

३२) तत्रैव, पृ.क्र. ४३.

३३) शिंदे ताराबाई लिखित स्त्रीपुरूष तुलना, १८८२, संपादक डॉ. नागनाथ कोतापल्ले, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९७, प्र.आ., पृ.क्र. १.

३४) तत्रैव, पृ.क्र. ६.

३५) तत्रैव, पृ.क्र. ६.

३६) तत्रैव, पृ.क्र. ३.

३७) तत्रैव, पृ.क्र. ५.

३८) तत्रैव, पृ.क्र. ६.

३९) शिंदे ताराबाई - स्त्री पुरूष तुलना, १८८२, संपादक - विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. पृ.क्र. ४१.

४०) तत्रैव, पृ.क. ४१.

४१) तत्रैव, पृ.क. ४८.

४२) तत्रैव, पृ.क. ४९.

४३) तत्रैव, पृ.क. ४९.